म. ग्रं. सं. ठाणें
…य मिबंध
नं. २३९

# जातभाई जैन.

हें पुस्तक

**बाळकृष्ण आत्माराम गुप्ते,**

साष्टीकर. एफ्. झेड. एस्.

यांनीं

**लिहिलें**

तें

एज्युकेशनसोसायटीच्या छापखान्यांत छापिलें

मुंबई.

१९०६.

किंमत ४ आणे.

लो. 290

# THE JAINS.

BY

B. A. GUPTE, F. Z. S.,

*Personal Assistant to the Director of Ethnography for India.*

दा. क्र. 90०२५

Bombay:

PRINTED AT THE

BOMBAY EDUCATION SOCIETY'S PRESS, BOMBAY.

1907.

Price, As. 4.

909

# जैन धर्माची माहिती.

जैन हे हिंदू आहेत, जैन हे बौध्य आहेत, जैन हे ज्यू आहेत असे अनेक तरंग अनेक देशांत चालू आहेत; तेव्हां हे आहेत तरी कोण, यांचे धर्मसंस्थापक कोण होते, वगैरे माहिती संक्षिप्तरूपानें स्वभावेंत प्रसिद्ध करावी असा हेतु आहे. हिंदुस्थान, ब्रह्मदेश, तिबेट, चीन व लंका या सर्व प्रदेशांत जैन लोकांची वस्ति आहे. हे मोठे धार्मिक व निरुपद्रवी लोक असल्याबद्दल त्यांची प्रसिद्धि आहे. **अहिंसा परमो धर्मः** हें त्यांच्या धर्माचें मुख्य तत्व आहे. त्यांचा मुख्य ग्रंथ **कल्पसूत्र**. त्यांत मुख्य विषय **'महावीरचरित्र.'** हा त्यांचा मोठा कैंवा शेवटला **तीर्थंकार.**

जैन मुनिराज महावीर इसवी शकापूर्वी ६६३ व्या वर्षी स्वर्गस्थ झाले, असें कर्नाक प्रांतांतील जैन ग्रंथांतील माहितीवरून अनुमान करितात. बंगाल प्रांतींच्या ग्रंथांधारें . कोलब्रूक साहेब ही निधनतिथि इ. स. पूर्वी ६३७ व्या वर्षी ठरवितात. जराथ प्रांतांतील ग्रंथांवरून इ. स. पूर्वी ५२७ वें वर्ष बसतें, कारण विक्रम–संवच्या पूर्वी ४७० वें वर्ष नमूद केलेलें आहे. मे. प्रिन्सेप् साहेब इ. स. पूर्वी ५६९ वें ठरवितात. रेव्हरेंड स्टिव्हनसन साहेब हीच तारीख खरी धरतात कारण महावीर ने गौतम मुनीचे गुरु होते असा आधार त्यांस सांपडला आहे. लंकेंतील जैन मंडळ निधन इ. स. पूर्वी ५४३ वे वर्षी धरतात, व महावीरनिधन ५६९ व्या वर्षी ात, **कल्पसूत्र** ग्रंथांत ज्योतिष शास्त्राचा उपयोग पुष्कळ ठिकाणीं केलेला आहे. , वार, नक्षत्र, योग, इत्यादिकांचें वर्णन ठिकठिकाणीं आहे. त्यावरून तो ग्रंथ वीरनिधनानंतर ९८० वर्षांनीं म्हणजे इ. स. ४११ त लिहिला असावा असें

ठरतें. ग्रंथलेखनानंतर १२ वर्षांनीं तो सम्मितीसमोर प्रसिद्ध रीतीनें वाचला गेला. त्याचा कर्ता भद्रबाहू नांवाचा होता, व तो ध्रुवसेन नामक गुर्जर प्रांतीं एक राजा होता, त्याच्या राज्यांत राहात असे. या ग्रंथावर चार भाष्यकार झाले.

(१) एक यशोविजय, त्याच्या भाष्याचें नांव **शाखाब्द**. (२) दुसरा, देवीचंद्र. (३) तिसरा ज्ञानविमल, व (४) चौथा सामयसुंदर ऊर्फ श्यामसुंदर.

रे. स्टिव्हनसन साहेब, म्हणतात कीं 'पौर्वात्य' अतिशयोक्तीचा महापूर महावीराच्या निधनतिथीवर आला नाहीं हें एक दुःखांत सुख समजलें पाहिजे! असो, पर्वताएवढ्या दुःखांतून ध्रुवसेनाचें नांव हा आधारस्तंभ धरून पुढें चालू. वलभी कुळांत ध्रुवसेन दोन झाले. पहिले फार जुने, आपल्या कामाचे नाहींत. दुसरा राजा ध्रुवसेन याच्या कारकीर्दीच्या शेवटल्या वर्षीं त्यास पुत्र शोक झाल त्यावेळीं हा ग्रंथ (कल्पसूत्र) वाचला गेला असें जरी धरलें, तरी, प्रत्येक पिढीस २५ वर्षें धरून अनुमान बांधल्यास, वर्षनिश्चय होतो. याला प्रमाण श्रीध्रु (श्रीध्रुव) राजाचें एक ताम्रपत्र सांपडलें आहे त्यांत आहे. त्याचा संवत ३७५ आहे. त्याचा इसवी सन झाला ३१८, त्यांत घातलीं पांच पिढ्यांचीं व १०५, मिळून झाले ४२३. वर सांगितलेंच आहे कीं कल्पसूत्र ग्रंथ ४११ इ. स लिहिला गेला. त्यांत मिळविले बारा, म्हणजे तो ग्रंथ लिहिल्या नंतर बार वर्षांनीं वाचला गेला, तेव्हां उत्तर–इ. स. ४२३. ग्रंथपठण!

या ग्रंथाचा एक मोठा उपयोग होत आहे. ख्रिस्ती शकानंतर हिं लोकांत सुधारणादेवीचा अम्मल फारसा नव्हता, असें म्हणणारांस आपला बे परत घ्यावा लागत आहे. कारण ब्राह्मण धर्मातील 'पिसाचा कावळा' करणा कोणत्याही पुराणाचा गंधही या ग्रंथांस नसून त्यांत लोकस्थितीचें वर्णन तसल्य प्रकारचें आहे. तेव्हां मुळाशीं कांहीं तरी खरेपणा असला पाहिजे. या शिव



भाष्यकार ठिकठिकाणीं पूर्वींच्या स्थितीचा व भाष्यलेखन प्रसंगाची तुलना करतात, त्यामुळें बोध चांगला होतो. इ. स. पूर्वी ६०० वर्षांच्या अंदाजीं मुनि महावीर झाले, त्यावेळचेंच वर्णन या कल्पसूत्र ग्रंथांत आहे असें नाहीं. हा ग्रंथ ज्यावेळीं रचला गेला त्यावेळीं वऱ्हाडांतील कुंडणग्राम व राजगृह या शहरीं असलेली स्थिति त्यांत निदर्शनास येते हेंच खरें.

महावीरापासून ग्रंथलेखन-वर्षापर्यंत दिलेली माहिती जैन ग्रंथकारांनीं इतक्या इमानानें लिहिलेली आहे कीं, रे. रिचर्डसन साहेब त्यांची वाहवाच करतात. जैन ग्रंथकाराचे लेख अतिशयोक्तीनें यत्रतत्र बरबटलेले नाहींत पण ही स्थिति तीर्थंकार पारस्वनाथापर्यंत राहिली. त्यानंतर त्यांच्या अंगांत असंभाव्य कल्पनारूप पिशाच्याचा संचार झाला. तीर्थंकार म्हटला कीं, त्याचें आयुष्य हजारों वर्षें दपटावयाचें. तत्रापि इतरत्र माहिती बरीच भरवशालायक आहे. उदाहरणार्थ:—

बुध मुनि म्हणजे बौध्य धर्माचा संस्थापक हा महावीर मुनि म्हणजे जैन धर्माचा एक तीर्थंकार याचा शिष्य होता, असें जैन ग्रंथकार लिहितात. पण गुरूच्या निधना नंतर मुख्य "शिष्य स्वामीचें" पद त्यास न मिळतां श्रीधर्मास मिळालें, असें कां? या प्रश्नाचें उत्तर "गोलमोल" मिळतें, त्याचें कारण उघड आहे. आपल्या गुरूच्या धर्मांत सुधारणा करून "शिष्यस्वामींनी" नवीन धर्माची स्थापना केली हें सांगण्यास त्यांस लाज वाटते! त्यांत नवीन म्हणजे सुधारलेला बौध्यधर्म जास्तीच फैलावला! आतां बौध्यधर्मानुयाही लेखक ही गोष्ट कोठेंच निदर्शनास आणीत नाहींत. त्यालाही कारण आहे! आपल्या धर्माच्या संस्थापकासही गुरु होता, आणि तोही जैन. हें कबूल करावें कोणी? पण "महावंसो" नामक बौध्य ग्रंथांतच याचा पुरावा मिळतो. बुधमुनीनें 'चोवीस' तीर्थंकारांनंतर धर्मस्थापना केली असें त्यांत आहे, व जैन ग्रंथांत महावीरानें २३ तीर्थंकारांनंतर जन्म घेतला आहे. तेव्हां मधला चोविसावा तोच बुधमुनीचा

गुरु महावीर, असें साफ ठरलें. हें खरें आहे; तरी गौतमबुद्धानें जैन धर्मास मागें हटविलें, आणि तेंही आपल्या बुद्धिसामर्थ्यानें, यांतही शंका नाहीं. बौध्य धर्माचा उच्छेद करणाऱ्या ब्राह्मण धर्माचें तेज वाढून तो फिका पडला त्यावेळीं जैन धर्मानें डोकें वर केलें, असें कोलब्रूक साहेब म्हणतात.

जैन धर्माचा मुख्य पुरस्कर्ता क्षत्रिय महावीर दिगंबर वृत्तीनें राहत असे. पारसनाथास लंगोटी तरी होती, पण महावीरानें तिचाही त्याग करुन इंद्रिय दमनाचा कळस करुन सोडला. बुध मुनीला वाटलें कीं सामान्य जनवृत्तीकडे पाहतां, दिगंबर वृत्ति मनोविकारास चेतना देईल, कारण अफाट जनसमूह इंद्रिय-निग्रहांत प्रवीण होणें संभवत नाहीं. यामुळेंच पीतवस्त्र परिधान करुन फिरण्याची चाल त्यानें पाडली. जैन व बौध्य धर्मांत दुफळी होण्याला मुख्य कारण हेंच असावें. अर्वाचीन जैन ग्रंथकार सुद्धां बुधदेवाची स्तुति करतात, त्याच्या तारतम्यज्ञानाची वाहवा करतात, व श्वेतांबरी पंथाचा स्वीकार करतात. बौध्यांचें अनुकरण आपण करतों असा डाग लागेल या भीतीनें पीतवस्त्र मात्र परिधान करीत नाहींत. ब्राह्मण धर्म 'स्वर्वस्वः' "सर्वभक्षंतु" आहे, असें ह्मणून रे. स्टीव्हनसन साहेब भगवीं वस्त्रें, गोसावी, बैरागी, ब्रह्मचारी वगैरे योगी वापरतात, असें सिद्ध करतात.

खि. श. पूर्वी सुमारें १०० वर्षें सहस्त्र-मल्लिक नांवाचा कोणी एक गृहस्थ होऊन गेला. त्यानें पुनः दिगंबरवृत्ति प्रचारांत आणली असें कांहीं लोक समजतात. पण खरी गोष्ट अशी दिसते कीं, त्यानें श्वेतांबरवृत्ति प्रचारांत आणून दुफळी केली.

जैन ग्रंथकार आपल्या ऋषभ नामक तीर्थंकाराचें जें वर्णन देतात, तें ऐतिहासिक असावें असें दिसतें. तोही महावीराप्रमाणें दिगंबर होता. हिंदू पुराणांतून ऋषभ राजा "नृपावळींत" दुसरा मानला गेला आहे; आणि भरताच्या



पितृस्थानीं त्याची योजना झाली आहे. संसारत्याग करुन तोही दिगंबर झाल्याचें वर्णन आहे. जैन आणि ब्राह्मण यांचें कधींच पटलें नाहीं. असें असून एथेंच मेळ मिळतो तेव्हां त्यांत कांहीं तथ्य असावें. जैन व ब्राह्मण यांच्या मतांत फरक इतकाच कीं, जैन म्हणतात दिगंबरवृत्ति अनुकरणीय आहे; व ब्राह्मण म्हणतात, ऋषभ राजानें जरी ही वृत्ति धारण केली होती, तरी इतरांस तसें करण्यास अधिकार नाहीं! कांहीं कां असेना? एक गोष्ट निर्विवाद आहे; कीं ऋषभ, कपिल, गौतम, शृंग इत्यादि ऋषींची राहणी परस्पर भिन्न होती. तिच्यावर धड न जैन धर्माचा, न बौध्य धर्माचा, न हिंदू धर्माचा "पेटंट" छाप बसला होता. म्हणजे हे धर्म वेगळे मानले जात नव्हते. पंथ या सदराखालीं यांची निवड होत असे, वर्ण होते, पण जात नव्हती. एका गरीब ब्राह्मणाच्या घरांतून काढून महावीरास श्रीमंत क्षत्रियाच्या घरांत चोरुन नेण्यास हरकत नव्हती. ब्राह्मण कुटुंब हलकें मानणें, ब्राह्मण वस्तीस 'दरिद्री आळी' मानणें, ब्राह्मण वर्णास तुच्छ मानणें, क्षत्रियांस वर्चस्व देणें, हे प्रकार सुरु झाले होते. पूर्वीचा वैदिक धर्म, शक्रासारखे वैदिक देव, यांचा उपमर्द होत नव्हता; तेही जकेस होतेच. पंचमहाभूतांची पूजा करणारे वेदांती या नवीन पंथाकडें आश्चर्यभरित मुद्रेनें पाहात होते. जैनांचा मनोनिग्रहाचा पंथ आदिपंथाच्या आटोक्या बाहेर होता. पण ते या सुधारकांस शिव्या देऊं लागले नव्हते. यामुळेंच बैरागी, गोसावी, नाथ, कानफाटे, ब्रह्मचारी वगैरे सर्व खिचडी चालून राहिली होती. शैवधर्माची गडबड मागून उडाली, लिंगमाहात्म्य नंतर माजलें. या शैव पंथानें हिंदुसमाजाचे धुडके उडवले. जाति पाडल्या, तट पाडले, रण माजविलें, आणि हिंदुपदपादशाहीच्या अफाट तरुवरावर कुठार घातला. प्रथम फक्त वाद सुरु झाला, अशोकाच्या शिलालेखांत पक्ष प्रतिपक्ष दर्शक उद्गार आहेत. पशुमेध बंद केला गेला होता. बौध्य धर्माच्या महात्म्यांनीं धर्मसंस्थापने करितां प्राणिमात्राचा व त्यांत मानवजातियांचा वध कधींच केला नाहीं. असलें अजिक्यपत्र ब्राह्मणांस देतां येणार नाहीं. ते स्वतः कबूल करतात कीं

इ. स. च्या आठव्या शतकांत कुमारिल भट्ट याच्या आज्ञेनें बौध्यधर्मीयांची कत्तल उडविली गेली, आणि शैव धर्मास बढती देण्यांत आली. याच वेळीं खरे क्षत्रिय मागें हटविले गेले, याच वेळीं परशुराम पुराणास झील देण्यांत आली, याच वेळीं शैव धर्म वाढविण्याकरितां ब्राह्मण जातींत हलक्या जातींतील लोक घुसडले गेले, याच वेळीं खरे अस्सल क्षत्रिय हताश होऊन फिरू लागले. शस्त्र हातीं घेतां येईना. कारण,

## अहिंसा परमो धर्मः

हा जबरदस्त पाश कंठीं ! पळापळ सुटली, नांवें बदलून बाह्यात्कारीं हिंदू बनून लेखकवृत्ति अगर शेतीवाडी, अगर नटनर्तक, परिचारक वृत्ति धारण करून "ज्ञात्रि" (ज्ञात) संभाळून राहणें भाग पडलें. या "ज्ञात्रि" शद्बाचीच झाली 'ज्ञाति,' ज्ञातीची झाली न्याति; नातीची झाली जाति, आणि जातीची झाली पुती. या पुती [पुत्रि] पासून अनेक फाटे व पोट फाटे फुटून पोट जाति झाल्या. सांगायाचें काय, कीं जातिभेदास हल्लींचें अभेद्यरूप येण्याची सुरवात इ. स. नंतर ८०० वर्षांनीं झाली, असा अंदाज बसतो. शिकंदर बादशाहा (अलेक्झांडर) यांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली त्यावेळीं मोठ्या आदरानें शशिगुप्तास एक ग्यासिडो-नियन ह्मणजे स्वदेशीय गृहिणी करून देऊन त्याच्याशीं स्नेह केला, म्हणजे पर-देशस्थांच्या मुलींशीं लग्न करण्यास त्यावेळीं हरकत नव्हती. पुढें मौर्य कुलांत मुरियाचें लग्न झालें, कल्पसूत्रांतील वेचे पुढें दिले आहेत. पुनरावृत्ति टाळण्या-करितां फाजील वर्णन व धर्मतत्वें गाळून टाकलीं, कारण या निबंधांत ऐतिहासिक 'नवनीत' काढण्याचा यत्न केला आहे. धर्मतत्वें शिकविण्याचा नाहीं. तत्रापि या जैन धर्मांत काय आहे ही उत्कंठा साहजिक उत्पन्न होते, ती पूर्ण करण्याकरितां "मायमाषेंत" थोडी माहिती देतों:—



(१) जैन लोक असें मानतात कीं, चल व अचल जग अनादिकालापासून अस्ति-त्वांत आहे. त्यांत अनेक प्रकारचे भवचक्राचे फेरे चालूच आहेत. सृष्टींत स्वयंभु शक्ति आहे. त्या शक्तीच्या योगानें इतरत्र देवाच्या मदतीशिवाय रहाटी चालली आहे. जगतांतील कांहीं तत्वें एकसमयावच्छेदेंकरून स्थित्यंतर पावून त्यांस देवकळा येते.

(२) प्रत्येक युगांत २४ तीर्थंकार झाले. ही कल्पना मागाहून त्यांच्यांत घुसली आहे. ॥ **यस्तीर्थं करोति स तीर्थङ्करः** ॥ येथें तीर्थ म्हणजे "मानसीक पुण्यमार्ग."

(३) भरतखंडाच्या दुसऱ्या ( ? ) बाजूस **ऐरावर्त** देश आहे. या-शिवाय म्लेंच, बर्बर, युगत, इत्यादि लोकांचे देश आहेत.

(४) भारतवर्षांतील लोकांची पहिली वस्ती मोडल्यावर युगलनामक लोक या देशांत आले त्यांनीं नवीन वसाहत केली. या युगलांची उत्पत्ति अनेक योनींच्या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कशी झाली हें कळत नाहीं.

(५) ब्राह्मणांप्रमाणें जैन लोकही असें समजतात कीं, स्वर्गलोक पुष्कळ आहेत, व नरकलोकही पुष्कळ आहेत. हल्लीं देवकळा पावून स्वर्गी असलेले महात्मे जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडून पृथ्वीतलावर येतील, व 'साधुपदास' पावून पुनः स्वर्गी न गेल्यास भवचक्रांत राहतील. या स्वर्गस्थ देवतांत बौध्यांचा शक्र, सक्के, सक्को, अथवा ब्राह्मणांचा इंद्र हा मुख्य आहे. अर्वाचीन जैनांनीं एका शक्राचे ६४ केले आहेत, आणि त्यांच्यांत सुधर्मन् यास मुख्य पद दिलें आहे.

(६) जो मुनि आपल्या तपःसामर्थ्यानें, ध्यानसामर्थ्यानें, जगतांतील विकारांस जिंकतो त्यास मरणानंतर **निर्वाण** प्राप्ति होते—सर्व सुखाचें धाम, सर्व ज्ञानाचें भांडार, व सर्व दुःखापासून मुक्तता प्राप्त होऊन, उंचांतउंच स्वर्गारोहण करण्यास

तो समर्थ होतो. या स्वर्गाचें नांव **सिद्धसीला.** तो धर्मात्मा देवांपेक्षांही सन्मान्य होऊन दोनही लोकीं ( मानव व देव ) वंद्य होतो.

( ७ ) जैन लोकांत दोन पक्ष आहेत. एक संसारी व दुसरा विरक्त. दोनही पक्षांत स्त्री पुरुष असतात. विरक्त पुरुषांस साधु म्हणतात. ते सर्व आपल्यास ब्रह्मचर्यव्रतधारी म्हणवितात. एका गुरूच्या ताब्यांत राहतात, स्त्रियांस **साध्विणी** म्हणतात, त्या पुरुषांपासून वेगळ्या राहतात, जैनांतील संसारी लोकांस **श्रावक** म्हणतात. म्हणजे **श्रवण** करणारे, ऐकणारे. स्त्रियांस **श्रावकी** म्हणतात.

( ८ ) जैन धर्मांत ५ कर्तव्यें आहेत, व पांच पातकें आहेत.

( अ ) **कर्तव्यें** ( १ ) सर्व प्राणिमात्रावर दया. (२) धर्म करणें. (३) जिवंत साधूंस मान देणें, व भूत साधूंच्या मूर्तीची पूजा करणें. ( ४ ) पातक विमोचनार्थ कबुली. (Confession) ( ५ ) उपोषण.

( ब ) **पातकें**:–( १ ) हिंसा. ( २ ) अनृत भाषण. ( ३ ) चोरी. ( ४ ) व्याभिचार. ( ५ ) संसार–विकार.

( ९ ) जैनधर्मांत नेमनिष्ठेनें वागण्याकरितां एक काळ नेमला गेला आहे. त्यास **पर्यूषण** अथवा **पज्जूसण** किंवा **पचूसण** म्हणतात. बौध्य धर्मास असाच एक काळ निवडला गेला आहे. त्यास **वास्सो** म्हणतात. भाद्रपद शुक्ल ५ मी म्हणजे ऋषिपंचमी या दिवसाच्या पूर्वींचे ५० दिवस, व त्या नंतरचे ७० दिवस, या पचुसणांत गणले जातात. श्वेतांबरी पक्ष ऋषिपंचमीच्या पूर्वीचे व दिगंबरी पक्षीय नंतरचे मानतात. (१०) रोमन क्याथलिक ख्रिस्ती लोकांप्रमाणें पापाची कबुली (Confession) करणें हा प्रकार लक्षांत ठेवण्यासारखा आहे. वर्षांतून एक वेळ तरी कबुली केली पाहिजे. पातकविमोचनार्थ आपल्याच मनाशीं कबुली करून पश्चात्ताप मानून, व्रत, दानधर्म करणें हा प्रकार सर्वत्र आहे. पण



पचुसणाच्या आरंभीं प्रत्येकानें साधुपुढें ' पाप कबुली ' केलीच पाहिजे. हा प्रकार हिंदुस्थानांत जैन लोकांतच आहे. त्यास ते **प्रतिक्रमण** (Confession) असें नांव देतात. गुजराथी भाषेंत **आलद्दण** म्हणतात. प्रतिक्रमण संस्कार हिंदुस्थानांतून ख्रिस्ती धर्मांत आला असें रेव्हरेंड **स्टी**व्हनसन् कबूल करतात.

जैन लोक वेदास मानीत नाहींत. जैन धर्मांतील दंतकथा इतक्या साध्या दिसतात कीं त्याजवरूनच हिंदुपुराणें केवळ कविसृष्टींत निर्माण झालीं असावीं असा भास होतो.

जैन तीर्थकारांची यादी खालीं दिली आहे; तींत त्यांच्या शरीराचा वर्ण कसा होता व त्यांचें आयुध, वाहन, अथवा चिन्ह (Emblem) काय होतें हें ही दाखविलें आहे. वाचल्यास बोध होईल.

| नांव. | वर्ण. | चिन्ह. |
|---|---|---|
| ऋषभ ... ... | पीत ... ... | नंदी. |
| आजित ... ... | ,, ... ... | हत्ती. |
| सांभव ... ... | ,, ... ... | अश्व. |
| अभिनंदन ... ... | ,, ... ... | वानर. |
| सुमती (स्त्री) ... ... | ,, ... ... | कुज अथवा कौंचारी नामकपक्षी. |
| पद्मप्रभ ... ... | रक्त ... ... | रक्तकमल. |
| सुपार्सव ... ... | पीत ... ... | स्वस्तिक. |
| चंद्रप्रभ ... ... | गौर ... ... | चंद्रकोर. |
| पुष्पदंत ... ... | ,, ... ... | मगर. |
| सीतल ... ... | पीत ... ... | श्रीवत्स. |

| नाव. | वर्ण. | चिन्ह. |
|---|---|---|
| श्रेयान्स (?) ... ... | पीत. ... ... | गेंडा. |
| वासुपूज्य ... ... | रक्त ... ... | बैल. |
| विमल ... ... | पीत ... ... | वराह. |
| अनंत ... ... | ,, ... ... | गरुड. |
| धर्म ... ... | ,, ... ... | गदा. |
| शांति ... ... | ,, ... ... | हरिण. |
| कुंथु ... ... | ,, ... ... | बोकड (अज). |
| अर ... ... | ,, ... ... | नंदवर्त (आकृति) |
| मल्ली ... ... | नील ... ... | घट (जलभरित) |
| सुव्रत ... ... | श्याम ... ... | कच्छ. |
| नाम ... ... | पीत ... ... | नीलकमल. |
| नेमी ... ... | श्याम ... ... | शंख. |
| पार्श्व ... ... | नील ... ... | सर्प. |
| वर्धमान ... ... | पीत ... ... | सिंह. |

क्षत्रियकुलवधु त्रिशला इला स्वप्नांत २४ पदार्थ दिसले ते:—

१ हत्ती.
२ बैल.
३ सिंह.
४ लक्ष्मी.
५ फुलांचा हार.
६ चंद्र.
७ सूर्य.

८ निशाण.

९ कलश.

१० कमळांनीं भरलेलें तळें.

११ समुद्र.

१२ विमान.

१३ मोत्यांची रास.

१४ धगधगीत निखारे. ( जाळ नाहीं असे. )

**जैन धर्मांत शुभदायक मानलेलीं चिन्हें.**

१ श्री वत्स.

२ सत्विक ( स्वस्तिक. )

३ सिंहासन.

४ फुलझाडाची कुंडी.

५ दोन मासे.

६ आरसा.

७ नंदिवर्त.

८ वर्धमान्.

जैन ग्रंथांच्या पठणानें बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. '**न्यात**' आणि न्यात-बंधु ( ज्ञात, ज्ञातबंधु ) हे शब्द **चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या** भाषणांत व लेखांत फार येत असत. मागधी "**नात पुत्त**" ( ज्ञातपुत्र ) या पदाचा उपयोग महावीराच्या नांवामागें झालेला आढळतो. महामुनी **वर्धमान** ऊर्फ महावीर **बुद्धमुनींच्या** वेळींच जिवंत होते. जैन धर्मांच्या **निर्ग्रंथ** असें नांव होतें. त्यांच्या साधूंस **अर्हत्** म्हणत. **वैसाली** येथें तिसरा अंगुत्तरनिकाय म्हणून एक राजा होता. त्याच्या पदरीं लोकांस

अभय

नांवाचा एक लेखक होता. तो म्हणतो "निर्ग्रंथ पंथाचे लोक आपण सर्वज्ञ आहों असें मानतात. नेमनिष्ठपणानें राहून (कर्मन्) कृतकर्मांचा म्हणजे पातकाचा नाश करतां येतो; व पुढेंही पातक न होण्याचा बंदोबस्त करतां येतो. कृतकर्मांचा झाडा झाला, कीं दुःखविमोचन झालेंच पाहिजे. दुःखविमोचन झालें कीं निरामयत्व, सुखदुःख समानत्व प्राप्त होऊन चिन्मय वृत्ति होते, आणि आखेर "निर्जर" दशा प्राप्त होते. हें परक्यानें लिहिलेलें सार किती खरें आहे याचा पुरावा जैन ग्रंथांत मिळतो. उत्तराध्यन अध्याय २९ श्लोक २७ यांत "तपश्चर्येनें (नेमनिष्ठपणानें) कृतकर्मांचा नाश होतो असें सांगितलें आहे; ३७ यांत तेंच आहे. जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडण्यास कृतकर्मच कारण आहे (अ. ३२). पुष्कळ ठिकाणीं या मताची पुनरावृत्ति जैन ग्रंथांतून आढळते. पंचेंद्रियांस आपल्या स्वाधीन ठेवून, षड्रिपूंस जिंकून, संसारांत राहिलें तरी दुःख-विमोचन होतें. महावग्ग नामक ग्रंथांत एक आख्यायिका आहे ती; "लिख्खवी राजांच्या पदरीं सीह (सिंह?) नांवाचा एक सेनापति होता. तो संसारांत राहून नातपुत्ताचा (महावीराचा) पंथ स्वीकारता झाला. त्याच्या मनांत बुद्धास भेटावयाचें होतें पण महावीरानें त्याचें मन वळवून तसें करूं दिलें नाहीं; कारण निर्ग्रंथी पंथ क्रियावादी होता व बौध्यपंथ अक्रियावादी होता. अखेर सिंह यानें अवज्ञा करून गौतम बुद्धाची भेट घेतली. तेथें गेल्यावर त्यानें आपला धर्म बदलला. उपाली नांवाचा महावीराचा आणखी एक शिष्य असाच बौध्य धर्मानुयायी झाला; कारण बुधदेव मनानें केलेल्या पातकाबद्दलही शिक्षा भोगावी लागते असें मानी, पण महावीर शरिरानें केलेल्या पातकास मात्र दंड आहे असें मानी. जैन धर्म बौध्य धर्माच्या पूर्वीचा आहे. याबद्दल पुष्कळ आधार आहे.

महावीराचा मख्खलिपुत्र गोसाल म्हणून एक शिष्य होता. तो महावीराजवळ सहा वर्षे राहिला. पुढें वेगळा निघून एक नवीन पंथ स्थापिता झाला. त्याच्या



चेल्यास आजीविक असें म्हणतात. बौध्य धर्मपुस्तकांत या पंथास अचेलक—परिव्राजक असें म्हणतात, व गोसाल हा नंद, वच्छ आणि किश संकिच्च यांचा अनुयायी होता असें म्हटलें आहे. जैन ग्रंथांत गोसाल आणि महावीर यांनीं एके ठिकाणीं तपश्चर्या केली असें लिहिलें आहे तें खरें दिसतें. त्यांनीं एकमेकांचीं कांहीं मतें स्वीकारून आपआपल्या पंथांत घुसडलीं आहेत. गोसाल, पारस्वनाथ वगैरे साधु महावीराच्या वेळीं होते. बुधही होता, निग्रंथ म्हणून एक होता, त्याचा मुलगा सच्चक म्हणून एक होता. कौशिक गोत्रोत्पन्न रोहगुप्त म्हणून एक साधु होता. त्यानें इ.स.१८ या सालीं त्रैराशिक मत म्हणून एक नवीनच शाखा काढिली. रोहगुप्तास चुलुय (चालुक्य ?) असें ही म्हणत. शदूलक, शार्दूलक, कौशिक, चुलुक याचा अर्थ घुबड अथवा पिंगळा असा आहे. ही माहिती ऋषींच्या उत्पत्तिबद्दल ग्रंथ लिहिणारांस उपयोगी पडेल. इंग्रेजी totem शब्दाचा परिस्फोट होईल.

**तात्पर्य**—*Confession* म्हणजे पापाचें क्षालन होण्याकरितां गुरुजवळ कबूलजाब देणें हें तत्व अस्सल जैन धर्माचें असून खिस्तिधर्मानें घेतलें आहे.

तसेंच बैबलांत तीन व्यापाऱ्यांची एक आख्यायिका, म्याथ्यूच्या २५ व्या अध्यायाच्या १४ व्या उपाध्यायांत व लूकच्या १९ व्या अध्यायाच्या ११ व्या उपाध्यायांत दिली आहे, तीही जैन लोकांपासून घेतली असावी असें एच ज्याकोबी साहेब आपल्या ४५व्या भागांत म्हणतात. या भागाचें नांव इग्रजींत दिल्यानें बोध चांगला होईल सबब वाचकांपुढें मांडलें जात आहे: तें असें:—

"Sacred Books of the East," edited by F. Max Müller, Vol. XLV., page xlii., Additional Note.'

जैन लोकांचे ग्रंथ संस्कृत पुराणांपेक्षांही पुराणे(जुने) आहेत असें,ज्याकोबी साहेब सिद्ध करतात. त्यांच्या ग्रंथांत विसंगतपणा फारच थोडा आहे असें "सरटिफिकीट" ते देतात. जैनपंथ व बौध्यपंथ यांतील कांहीं शास्त्रार्थ मिळते आहेत तेवढ्यास भुलून पाश्चिमात्य लेखकांनीं ते दोनही पंथ एकच आहेत असें मानलें, ही चूक होती.

महावीर हा कल्पित पुरुष नव्हता. तो राजा सिद्धार्थ याचा मुलगा होता, असें वर सांगितलेंच आहे. त्याचें गांव कुंडनग्राम हें मोठें शहर नसेल किंवा सिद्धार्थ हा एक मोठा राजा नसेल. बौध्य धर्माच्या लोकांनीं सुद्धां कपिलवस्तु व शुद्धोदन यांचें असेंच सालपाला लावून वर्णन केलेलें आहे.

आचारांग सूत्रांत कुंडनग्रामास "समनिवेश"म्हणजे व्यापाऱ्याची उतरण्याची, राहण्याची सराई सारखी एक जागा होती असें म्हटलें आहे. हें लहानसें रहदारीचें गांव विदेह देशांत होतें असें त्याच सूत्रांत आहे. बौध्य ग्रंथांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं ( महावग्ग ) गौतमबुद्ध कोटीग्रामीं रहात असतांना त्यास अंबापल्ली नांवाची एक नायकीण भेटण्यास गेली, व वैसाली गांवचा राजा लिच्छवही भेटला. तेथोन बुधदेव 'नाटिका' एथें गेला. तेथें एका घरांत तो राहिला. अंबापल्ली नायकिणीचा अंबापल्लीवन नामक बाग जवळच होता. तिनें तो गौतम बुद्धास धर्मार्थ दिला. तेथोन तो वैसालीस गेला व तेथील लच्छवी घराण्याचा सेनापति जैन धर्मानुयायी सिंह नामें एक गृहस्थाश्रमी होता त्यास दीक्षा दिली. यावरून बौध्य ग्रंथांतील कोटिग्राम व जैन ग्रंथांतील कुंडग्राम हीं एकच असावीं असें ठरलें. "नाटिका" हा शब्द "ज्ञात्रिक" शब्दाचा अपभ्रंश असावा, व ज्ञात्रिक ह्मणजे महावीराचे "न्यातबंधु" जातवाले क्षत्रिय. कुंडग्राम हें वैसाली शहराच्या पाड्यासारखें असावें. वैसाली ही विदेह देशाची राजधानी होती. महावीराला सूत्रकृतांगांत' वैसालिक असें म्हटलें आहे. वैसालिक म्हणजे वैसालीकर आणि

कुंडनग्राम जर वैसालीचा पाडा ( Suburb ) गणला गेला होता, तर कुंडनग्रामांत जन्मलेल्या गृहस्थास वैसालिक म्हणण्यांत आलें याचें नवल नाहीं. गिरगांवांत जन्मलेल्या मुलास 'मुंबईकर' म्हणण्यास हरकत नाहीं. अथवा, पर्वतीवर जन्मलेल्या मुलास पुणेकर म्हणण्यास हरकत नाहीं. कुंडनग्राम पाडा ठरला कीं तेथील राजाही मांडलिक ठरतो. उदाहरणार्थ, 'जुन्या इंदूरचे जमीदार साहेब.' जैन लोकांनीं सिद्धार्थाला मोठा बलिष्टराजा म्हणणें साहाजिक आहे. कविलाचव थोडें बहुत प्रमाणानें सर्वत्र आढळतें. सिद्धार्थ हा एक मांडलिक अथवा पाळीगार होता असें वाटतें. त्यास नुसतें क्षत्रिय असें उपपद लावलेलें आढळतें. व त्याच्या बायकोस नुसतें क्षत्रियाणि असेंच उपपद लावलेलें आढळतें. ज्ञात्रिक क्षत्रियांचा उल्लेख आहे तेथें सिद्धार्थाचे ताबेदार असल्याचा उल्लेख दिसत नाहीं. बरोबरीचे असावे अशा तऱ्हेचे शब्द वापरले गेले आहेत. यावरून राजघराण्याशीं संबंध असलेल्या सरदारांप्रमाणें सिद्धार्थही एक असावा असें वाटतें. शरीरसंबंधानें तो मोठमोठ्या घराण्यांचा जवळचा नातेवाईक होता. त्याची गृहिणी त्रिशळा ही वैसालीचा राजा केतक याची बहीण होती. तिला वैदेही असेंही ह्मणत, विदेहदत्ता असें आणखी एक नांव तिला होतें. कारण इतकेंच कीं राज्यकर्त्या विदेह देशाधिपतिच्या घराण्यांत तिचा जन्म झाला होता. बौध्य ग्रंथांत केतक राजाचें नांव नाहीं, तरी वैसाली येथें एक कौन्सिल असून त्याजवर अध्यक्ष एक सेनानी होता असा लेख सांपडतो. राज्यकर्ते लिख्खवी होते. निरावली सूत्रांत केतक राजावर चंपा नगरीचा, राजा कुनिक ( कर्णिक, कनिष्क ) उर्फ अजात शत्रु यानें स्वारीची तयारी केली, त्यावेळीं केतक राजानें काशी, कोसल, लिख्खवी, व मल्की या राजास विचारणा केली कीं कुनिष्क राजाची मागणी मान्य करावी किंवा नाहीं.

महावीराच्या निधनानंतर वर दिलेले "अठरा" देशचे राजे एकत्र जमून त्यांनीं उत्सव केला, केतक राजाचा विशेष नामोच्चार केलेला नाहीं यावरून तो या १८

पैकीं एक "दोस्त सरकार" होता असें दिसतें, याशिवाय त्याच्या राज्यांत कौन्सिल म्हणजे पार्लमेंट होतें. तो महावीराचा मामा होता, त्यामुळें त्याच्या वैसाली नगरास बौध्य लोक नास्तिक स्थान म्हणत, व जैन लोक आपल्या धर्माचें आदिपीठ समजत--नवीन पंथ स्थापन करण्यांत महावीरास जय कां व कसा मिळाला हें या इतिहासावरूनच लक्षांत येणार आहे. ज्याप्रमाणें यादव कुळांत श्रीकृष्णाचा जन्म झाला, बुधाचा राजकुळांत जन्म झाला, तसाच महावीराचाही जन्म राजकुळांत होता. पूर्वकाळीं कुळाचें माहात्म्य फार असे, म्हणूनच जैनग्रंथांत महावीराच्या सर्व नातलगांचीं कुळें व गोत्रें काळजीपूर्वक दिलेलीं आहेत, आणि ब्राह्मणांपेक्षां क्षत्रिय उंच अथवा श्रेष्ठ आहेत असें त्यांत वारंवार प्रतिपादन केलें आहे. बुध व महावीर या दोघांनींही आपल्या उच्चकुळाचा उत्तम उपयोग करून घेतला यांत शंका नाहीं. त्यांचें वजन पडण्यास त्यांची जात(ज्ञात्रि, ज्ञाति, न्यात)उपयोगास आली. राजघराण्यांशीं प्रत्यक्ष संबंध असणें हें त्यांच्या पथ्यावर पडलें.

मातृपक्षाकडून महावीर मागध देशाच्या राजाचा संबंधी होता; कारण चेतक राजाची मुलगी चेलना ही बिंमीसार उर्फ बिंबिसार सेनीय ( शेणवी-सेनापति ) मागध देशचा राजा याची राणी होती. तिची राजधानी राजगृह नांवानें प्रसिद्ध होती. जैन व बौध्य या दोनही पक्षाचे लोक आपल्या ग्रंथांत त्याची स्तुति करतात. तो माहावीर व गौतमबुद्ध या दोघांचाही आदर करी. बौध्य धर्मांचे कुनिक लोक ( कनिष्क ) त्यास अजातशत्रु म्हणत. त्याच्या चेलानी नांवाच्या विदेहराजतनया राणीच्या पोटीं मुलगा झाला. त्यानें प्रथम प्रथम बौध्यधर्मीयांस मदत केली नाहीं, पण गौतमबुद्धाच्या मरणापूर्वी आठ वर्षें तो त्या धर्माचा पुरस्कर्ता बनला. त्यानें आपल्या बापाचा वध केला होता, आपल्या मातामहाशीं युद्ध केलें होतें. तेव्हां असला राजा धर्मिष्ट असण्याचा संभव कमी. विदेह देश आपल्या राज्यास जोडण्याचा बेत त्यानें केला



होता, म्हणून त्यानें पातलीग्रामीं एक किल्ला बांधला. हेतु काय कीं विदेह-लोकांत वृजी म्हणून एक पोटभेद होता त्यांना जिंकून वैसालीचा राजा याला शह देणें! पण वैसालीचा राजा महावीराचा मामा होता, त्यामुळें अजातशत्रूनें त्याच्याशीं द्वेष केल्यामुळेंही सर्व जैन लोक त्याच्यावर उलटले म्हणून स्वारीनें बौध्य धर्मास हातीं धरलें. पूर्वीं तर आपल्या बापाचे स्नेही म्हणून त्यांचा छळ केला होता. अजातशत्रूनें वैसाली शहर घेतलें व नंद आणि मौर्य या घराण्यांचा पाया यांनेंच घातला. हीं राजकारणेंच बौध्य, व जैन धर्मांचा प्रसार होण्यास कारणीभूत झालीं. बाकीचे पंथ बुडाले.

महावीराचा वंशवृक्ष खालीं दिला आहे.



वर्धमान महावीर काश्यप गोत्रोत्पन्न होता, आपल्या लहानपणीं तो आईबापांजवळ व त्यांच्या मागें आपला वडील भाऊ नंदिवर्धन याजजवळ राहत होता. नंदिवर्धन राज्य करीत असतांना, वर्धमान आपल्या वयाच्या २८ व्या वर्षी साधु झाली. ज्याकोबी साहेब म्हणतात कीं युरोप खंडांत थोर कुळांतील धाकट्या पातीचे पुरुष रोमन क्याथलिक धर्मांत शिरत असतात, त्याच प्रमाणें हिंदुस्थानांत ही चाल होती असें दिसतें.

त्यानें बारा वर्षे तप केलें. तो राधा नांवाच्या देशास भ्रमण करीत गेला होता. घर सोडल्यानंतर एक वर्षानें तो दिगंबर झाला. पुढें बारा वर्षें वनवास पुरा होतांच केवल झाला. पुढें तीर्थंकार झाला. केतक, श्रेणिक, व कनिक या राजघराण्यांची त्यास मदत होती तशीच विदेह, मागध, व अंगध देशच्या राजांचीही होती. हिमालयाच्या पायथ्यापर्यंत त्यानें पर्यटण केलें होतें. त्याच्या शिष्यांस गणधर म्हणत. मखलीचा मुलगा गोसाल याजपासून त्यानें अजिंक्य पत्र घेतलें. बौध्य ग्रंथांत त्यास नातपुत्त ( ज्ञातिपुत्र, जातभाई ) म्हणत व तो निर्ग्रंथीय पक्षाचा मुख्य गुरु आहे असें मानीत. एका ठिकाणीं त्याचें गोत्र अग्नि 'वैश्यायन' असें दिलें आहे. पण ती चूक त्याच्या शिष्याच्या म्हणजे सुधर्मन्च्या गोत्रावरून झाली आहे. त्याच्या मागें सुधर्मन् हाच मुख्य गुरु झाला होता. महावीर, बुध, बिंबीसार, त्याचे मुलगे अभयकुमार व अजातशत्रु, लिच्छवी मल, गोसाल हे सगळे एककालीन पुरुष होते.

याप्रमाणें महावीराच्या इतिहासाची पुनरावृत्ति करून सांगायचें काय, यांतील एकही गोष्ट गौतमबुद्धास लागू पडत नाहीं. तेव्हां गौतमबुद्धानंतरचा महावीर हें म्हणणें शोभणार नाहीं. दोघांचा आयुष्यक्रम सारखा दिसण्यांत नवल नाहीं. दोघेही साधु, व साधूंच्या आयुष्यक्रमांत असायचें तें काय? रानीं गेले, तपश्चर्या केली, उपदेश केला, विरक्त राहिले, मेले. महावीराच्या



गौतमबुद्धाच्या कांहीं नातलगांचीं नांवें सारखीं आहेत हें नामसादृश्य म्हणजे एकाची बायको यशोदा, दुसऱ्याची यशोधरा, एकाचा भाऊ नंदिवर्धन, दुसऱ्याचा नंद, बुद्धाचें पाळण्यांतलें नांव सिद्धार्थ, महावीराच्या बापाचें नांव तेंच, पण त्यांत इतकेंच सिद्ध होतें कीं दोघेही क्षत्रिय कुलावतंस असल्यामुळें त्यावेळच्या क्षत्रिय जातींतील नांवें त्यांच्या कुळांत आढळतात—पराक्रमी पूर्वजांचीं नांवें अर्भकांस देण्यांची वहिवाट सर्व राजघराण्यांत आहे—दोघांचाही ब्राह्मणांवर कटाक्ष, कारण दोघेही क्षत्रिय.

आतां दोघांत फरक काय होता तें पाहूं. गौतमबुद्धाचा जन्म कपिलवस्तु येथें झाला, महावीराचा वैसाली शहराच्या एका पाड्यांत झाला, बुधाची आई त्याचा जन्म होतांच मेली, महावीराचे आईबाप तो वयांत येईपर्यंत जिवंत होते. बुध आपल्या बापाच्या देखत त्याच्या इच्छेविरुद्ध विरक्त झाला, महावीर आपल्या आईबापांच्या मरणानंतर व वडील भावादिकांच्या सम्मतीनें साधु झाला; बुधानें सहा वर्षे उपासतापास काढून तपश्चर्या केली, महावीरानें बारा वर्षे केली, त्यांतील सहा वर्षे फुकट गेलीं, व असली तपश्चर्या निरर्थक होय असें बुध म्हणे. महावीराचा ग्रह असा झाला होता कीं बारा वर्षे आपण तपश्चर्या केली ती अवश्य होती. तो तीर्थंकार झाल्यावर सुद्धां उपासतापास करी. बुधाच्या प्रतिस्पर्ध्यांत गोसाल, व जमालि, यांचीं नांवें येत नाहींत. बुधाच्या शिष्यवर्गाचीं नांवें महावीराच्या शिष्यवर्गाच्या नांवांशीं मिळत नाहींत. आखेर बुध कुशिनगरास समाधिस्थ झाला, व महावीर पापागांवीं बुधाच्या पूर्वी समाधिस्थ झाला. तेव्हां ते एकमेकांपासून भिन्न पुरुष होते व यांचे पंथही भिन्न होते यांत शंका नाहीं.

महावीर एका दरिद्री म्हणा, हलक्या म्हणा, ब्राह्मणीच्या पोटीं प्रथम जन्मास आला; तेव्हां इंद्रानें एकंदर ब्राह्मण जातीला गालिप्रदान करून तो गर्भांत असतांना कृष्णाप्रमाणें त्याची उलटापालट केली. ही गोष्ट असंभाव्य आहे. दिगंबरानुयायी ती मानीत नाहींत. पण श्वेतांबरी तिजवर भरंवसा ठेवतात. ज्याकोबी

साहेबाचें म्हणणें असें आहे कीं ब्राह्मणजातीय देवानंदा, व क्षत्रियजातीय त्रिशला या दोघीही सिद्धार्थाच्या बायका होत्या. त्यांत त्रिशला ही राजकन्या असल्यामुळें व तिचें माहेरचें गोत मोठें कीर्तिवान् असल्यामुळें, राजानें ब्राह्मणीच्या पोटचा आपला मुलगा क्षत्रियाणीच्या ओटींत घातला असावा. ऋषभदत्त हें त्या ब्राह्मणीच्या नवऱ्याचें नांव मागाहून जैन लोकांनीं आपल्य ग्रंथांत ढकललें आहे. प्राकृत भाषेंत हें नांव उषभदिना असें लिहिलें गेलें पाहि होतें. मग ऋषभदत्त कां लिहिलें? या शिवाय दुसरा पुरावा असा आहे क हें नांव जैनास दिलें पाहिजे होतें. ब्राह्मणास देण्याची वहिवाट नव्हती! का असेल तें असो. पण आपल्या प्रत्यक्ष पाहण्यांत असलेली गोष्ट येथें द्यावि वाटते. इंदुराधिपति श्रीमंत तुकोजीराव महाराज यांस एका यवनीच्या पो पुत्र झाला. त्याचा नाल कापण्यापूर्वी श्रीमंतांनीं त्यास आपल्या चौथ्या राण च्या ओटींत घातलें. कारण तिला अपत्य नव्हतें. त्यांचें नांव पार्वति मा साहेब राजबीज यवनीच्या घरांत जाऊं नये म्हणून 'आजकालच्या' गोष्टींत जर हा प्रक दिसून येत आहे तर सिद्धार्था सारख्या शेंकडों वर्षापूर्वीच्या राजानें वर्णाभिम बाळगून श्वशुरपक्षाचें पाठबळ मिळविण्याकरितां अर्भकाची अदलाबदल के असल्यास नवल नाहीं.

जैन लोक निर्ग्रंथी असून ग्रंथ कोठले आणलेत? हा प्रश्न सहज उभा राह त्यास उत्तर इतकेंच कीं तोंडीं पाठ केलेले नियम तीर्थकारांच्या मागें विसरून असतील व जातील या भीतीनें इ. स. ४५४ च्या सुमारास वल्लभी राजा कौन्सिलांत देवर्धि नामक अध्यक्षाच्या नजरेखालीं जैन ग्रंथ लिहिले गेले, कल्पसूत्रांतच सांगितलें आहे. देवर्धि गण यानें लेखनकलेचा उपयोग कर त्या पूर्वी जैनांचे ग्रंथ लिहित नसत.

जैन ग्रंथांत ग्रीक लोकांची ज्योतिषसरणी मुळींच नाहीं. राशीचें नांव न त्यामुळें इ. स. ४०० वर्षाच्या पूर्वीच त्यांचे ग्रंथ रचले गेले होते असें दि



भरतवर्षांत जंबुद्वीपांत देवानंदा नामक ब्राह्मण स्त्रीच्या गर्भापासून त्रिशला नांवाच्या क्षत्रिय स्त्रीच्या गर्भांत महावीर यास शक्राच्या (इंद्राच्या) आज्ञेनें हरिणैगमैशिनयानें नेलें. महावीरापूर्वी इक्ष्वाकु कुळांत काश्यपगोत्रांत २१ तीर्थकार होऊन गेले होते, गौतम गोत्रांत हरिवंशांत २ झाले होते, एकूण २३. महावीर हा शेवटला म्हणजे २४ वा तीर्थंकर होय. प्रथम जालंधरायण गोत्रांतील देवानंदा नांवाच्या ऋषभदत्त ब्राह्मणाच्या बायकोच्या पोटीं गर्भधारण झालें. त्याचें गोत्र कोडाल होतें. गांवाचें नांव कुंडग्राम. हा जालंधरायण गोत्रांतील देवानंदा स्त्रियेच्या गर्भांत होता त्या वेळीं तिला उत्तम स्वप्नें पडलीं. ज्ञानदृष्टीनें ही खबर इंद्राला कळतांच तो म्हणाला.

"अर्हत, चक्रवर्ती, बलदेव, अथवा वासुदेव यांचा जन्म, हलक्या, नीच," "पतित, दरिद्री, भिकारी, हात पसरणाऱ्या जातींत व ब्राह्मण घराण्यांत कधीं" "झाला नाहीं, होत नाहीं, व होणार नाहीं." अर्हत, चक्रवर्ती, बलदेव आणि वासुदेव हे थोर घराण्यांत, सरदार घराण्यांत, राजघराण्यांत, कीर्तिवान घराण्यांत, इक्ष्वाकु वंशांत, हरिवंशांत, अथवा अशाच एखाद्या लोकोत्तर कुळांतच जन्म घेतलेले, घेतात, व घेतील. त्यांचा पितृपक्ष व मातृपक्ष दोनीही कुळें सर्वमान्य असलीं पाहिजेत. पण हल्लीं एक चमत्कारिक प्रकार घडत आहे. हलकट ब्राह्मण कुळांतील स्त्रियेच्या पोटीं महावीर जन्म घेत आहे. असल्या नीच कुळांत म्हणजे, भरतवर्षांत जंबुद्वीपांत, कुंडग्रामाच्या दक्षिण भागांत, जालंधर गोत्रांतील देवानंदा स्त्रियेच्या पोटीं म्हणजे कोदाल गोत्रांतील ऋषभदत्त नांवाच्या भटाच्या बायकोच्या पोटीं अर्हत जन्म घेत आहे! असल्या हलकट, नीच घराण्यांतून त्यास काढलें पाहिजे. कुंडग्रामाच्या उत्तरेकडील क्षत्रिय भागांत नेऊन क्षत्रिय कुलावतंस श्री त्रिशला वासिष्ट गोत्रोत्पन्न असून काश्यप गोत्रीय क्षात्रतेज विराजित सिद्धार्थ नामा ज्ञात्रिपुत्र आहे त्याच्या स्त्रियेच्या गर्भांत त्यास नेलें पाहिजे, व त्रिसलेच्या पोटांतील गर्भ भटणीच्या पोटांत घातला पाहिजे". असा विचार करून

हरिणैगमैशिन नामक आपल्या गंधर्वांकडून तसें करविता झाला. हा हरिणैगमै-
शिन इंद्राच्या पायदळावरील दलपति होता. क्षत्रियपत्नि त्रिशला इच्या महा-
लांत तसविरी पुष्कळ होत्या, बाहेरून चुना देऊन भिंती पांढऱ्या शुभ्र
केल्या होत्या. छतावर चित्रें काढलेलीं होतीं, रत्नजडित खांबामुळें
अंधारास थारच नव्हता. जमीन सपाट, गुळगुळीत करून तिजवर
शुभदायक कशिदा काढलेला होता. अनेक रंगांच्या पुष्पगुच्छांनीं
हारांनीं महाल सुशोभित केलेला होता, अगरबत्त्या लावल्यामुळें सुगंध वाहत
होता, मसालेदार सुवासिक द्रव्यें एकत्र करून सडा घातला होता. अत्तर, गुलाब
यांची रेलचेल होती, एका पलंगावर, साडेतीन हात लांब त्रिछान्यावर, उश्यागि
ऱ्यांच्या राशींत, नरम अशा स्थळीं, कशिद्याच्या चादरीनें झांकलेल्या लाल रंगाच्या
मच्छरदानीच्या आंत, आनंदलहरींत झोंके खात असलेल्या, पारिजात वृक्षाच्या जव
ळच्या खिडकीखालीं चंदनाच्या उटीमुळें 'शैवालें युक्त जैसें पंकज तें शोभतें'
याप्रमाणें अति रममाण स्थितींत सति त्रिशला मधून मधून डुलक्या घेत होती
तिलाही स्वप्नांत १४ शुभ पदार्थ दिसले. जागी होतांच हंसगतीनें ती आपल्या
पतीच्या म्हणजे क्षत्रिय सिद्धार्थाच्या पलंगाजवळ गेली, व मधुर, आल्हादकारक
प्रेमभरित पण प्रौढ, कानास गोड, शुभ, हृदयानंदकारक, नेमस्त, अशा शब्दांनीं
त्यास जागी करती झाली. सिद्धार्थाची आज्ञा होतांच, श्री त्रिशलाही त्याच्या
पलंगाजवळच एका रत्नजडित सिंहासनावर बसली, व तिनें आपलें स्वप्न त्यां
निवेदिलें. तें श्रवण करून—जें आहे तें—त्यास फारच आनंद झाला, व त्यावर
तिच्या पोटीं अर्हतानें जन्म घेत असल्याचें तिला सांगितलें. हें ऐकून ती आनंद
आपल्या पलंगावर जाऊन पहुडली. उजाडतांच क्षत्रिय सिद्धार्थानें आपला दरबार
भरविला. प्रथम जागा साफ करवून, चंदनाचे सडे घालवून, पुष्पलतांनीं
सुशोभित करवून, धूप देववून, दिवाणखाना तयार करविला होता. प्रातर्विधि
करून, तालीम करून, स्वारी बाहेर आली. तेथेंही दंड, पट्टा, कुस्त्या मल्लख

वगैरे झाल्यावर अंगास अत्तर, अर्गजा, उटणीं लावून स्नान घालण्यांत आलें. स्नानगृहाला सुंदर झरोके होते, त्यांस मोत्यांच्या जाळ्या लावल्या होत्या. रंगीबेरंगी रत्नें लावून जमिनीवर वेली काढलेल्या होत्या. स्नानाच्या शिळेवर तर पच्चीचें काम फारच उत्तम केलेलें होतें. स्नानाच्या पाण्यांतसुद्धां सुगंध द्रव्यें होतींच. अशा रीतीनें मंगलस्नान झाल्यावर सरकारस्वारी उंची पोषाख, व रत्नजडीत डागिने घालून, छत्रचामर चिन्हांनीं विराजित होत्साती दरबारांत प्रविष्ट होती झाली! दरबाराच्या भव्य दिवाणखान्यांत ईशान्य दिशेस आठ रत्नजडित सिंहासनें मांडलीं होतीं. मुख्य सिंहासनापासून फार जवळ नाहीं, व फार दूरही नाहीं इतक्या अंतरावर एक रत्नजडित जाळीदार पडदा लाविला होता, त्याजवर घोडे, नंदी, माणसें, जलदेवता, पक्षी, नाग, किन्नर, शरभ, वनगाई, संसक्त (?) हत्ती, झाडें, वेली वगैरे चित्रें काढलेलीं होतीं. या पडद्याच्या आंत क्षत्रियकुलवधू त्रिशला इला एका सुंदर रत्नजडित सिंहासनावर बसविलें. नंतर परिचारिकांस आज्ञा करून स्वप्नाचा अर्थ सांगणारे पंडित सभेंत आणले. त्यांस मंगलद्रव्यें देऊन, त्यांच्या शिरांवर दुर्वा ठेवून, त्यांस नजरनजराणे देऊन सभेंत बसविलें. त्यांस स्वप्न सांगून अर्थ विचारला. त्यांनीं योग्य चर्चा करून जबाब दिला कीं, स्वप्नांत दिसलेल्या १४ पदार्थांपैकीं ७ च ज्या स्त्रियेच्या स्वप्नांत येतील तिच्या पोटीं प्रत्यक्ष वासुदेव जन्म घेतो, ४ दिसल्यास बलदेवाचा अवतार होणार असें समजावें; एकच दिसल्यास कोणी मांडलिक राजा जन्मास येत आहे असें समजावें, यावरून देवी त्रिशलेच्या पोटीं चक्रवर्ती तर काय, पण त्रैलोक्यनाथ धर्मसंरक्षक जीन येणार हें खचित! हें भविष्य श्रवण करून क्षत्रियाणी त्रिशिला सद्गदित होऊन आपल्या महालांत परत गेली.

'ज्ञातिपुत्राच्या' घराण्यांत याप्रमाणें महावीराचा प्रवेश होतांच लक्ष्मीला भरतें आलें, राज्य वाढलें, धान्य समृद्धी झाली, सैन्य वाढलें; गांव, शहरें, प्रांत काबीज झाले, रत्नभांडार भरून गेलें, सबब त्याचें नांव **वर्धमान** ठेवण्याचा

निश्चय केला. उत्तम पक्वान्नें पण मितआहार, सुंदर बगीचांत एकांतस्थळीं नियमित व्यायाम, व्यवस्थितपणा, इत्यादिकें करुन व डोहाळे पुरविल्यामुळें आनंद वृत्तीनें असतांना, श्री त्रिशलादेवीच्या पोटीं, चैत्र वद्य चतुर्दशीस चंद्र उत्तराफाल्गुनी नक्षत्राच्या घरांत असतांनां, मध्यरात्रीस शुभ मुहूर्तावर अर्हत **महावीर** जन्मास आले. त्यावेळीं वैश्रवणाच्या आश्रितांनीं ( यक्षांनीं ) पुष्पवृष्टि व रत्नवृष्टि, केली.

प्रातःकाळ होतांच सुक्षत्रिय **सिद्धार्थानें** आज्ञा केली कीं कुंडनपुरांतील सर्व कैदी सोडून द्यावे, मापें व वजनें वाढवावीं, सर्व शहरांत सडा सम्मार्जन करावें- दोन, तीन, चार, अथवा अधीक रस्ते एकत्र मिळतात त्या चव्हाट्यावर मंडप बांधले जावे, सर्व शहरभर निशाणें फडकवावीं, झेंड्या लावाव्या, बैठका तयार करवाव्या. गोपिचंदन, रक्तचंदन, "दर्दर" चंदन, यांचा कणा भिंतींवर काढवावा. पंजे उठवावे. दरवाजांत जलकुंभ भरून ठेवावे, शहरांत प्रत्येक कमानीखालीं असेच जलकुंभ ठेवावे. सर्व शहर फुलांच्या गुच्छांनीं व हारांनीं सुशोभित करावें. अत्तर, गुलाब, अर्गजा वांटला जावा, नट, नाटकी, कोल्हाटी, मल्ल, बहुरूपी, कथेकरी, गोंधळी, तमासगीर, भांड, आख्यायक (?), अरक्षक (?), तालचर ( हातानें ताल धरणारे), गारोडी, फळें विकणारे, तुतारे, सणईवाले, इत्यादि लोक एकत्र करावे. दहा दिवस याप्रमाणें उत्सव झाला. भेरी, मृदंग, दुंदुभी, यांचा दणदणाट सुरु होता. सर्व प्रकारचे कर, व पट्टया माफ झाल्या. दंड माफ केले गेले, नाचतमाशांची गर्दी उसळली, चहूंकडे आनंदीआनंद भरुन गेला. पहिल्या दिवशीं मध तोंडांत घातली, तिसऱ्या दिवशीं सूर्यदर्शन दिलें, सहाव्या दिवशीं जागरण झालें, अकराव्या दिवशीं आई मोकळी झाली, बाराव्या दिवशीं बारसें. त्यादिवशीं 'ज्ञात्रिक' क्षत्रियांस ( ज्ञातबंधूंस ) भोजन दिलें. या पुत्ररत्नाच्या गर्भवासापासूनच आमची भरभराट होऊं लागली, त्यामुळें त्याचें नांव **वर्धमान** आम्हीं ठेवीत आहों, असें राजानें प्रसिद्ध केलें.

श्री महामुनि **महावीर** काश्यप गोत्रोत्पन्न होते. त्यांच्या वडिलांनी त्यास **वर्धमान** असें नांव ठेविलें, षड्रिपूंचा त्यांच्यावर अम्मल चालला नाहीं त्यामुळें त्यास **श्रमण** असें नांव पडलें. **महावीर** हें नांव त्यास देवापासून प्राप्त झालें.

**महावीराचा** बाप **काश्यपगोत्रोत्पन्न** होता. त्यासही तीन नावें होतीं. ( १ ) **सिद्धार्थ**, ( २ ) **श्रेयौंस**, आणि ( ३ ) **जसौंस**. महावीर स्वतः 'ज्ञात्रि' क्षत्रिय होते, ते फार बुद्धिवान्, रूपवान्, गुणवान्, भाग्यवान्, व विनयवान्, होते. ते 'ज्ञाति क्षत्रियाचे' पुत्र; तोही **विदेह** कुळांतला, **विदेह**दत्ता नांवाच्या **विदेह** राजकन्येचा मुलगा, विदेह देशीं तीस वर्षें **महावीर** मातुलगृहीं राहत होते, लग्न होण्यापूर्वी **महावीर** यांनीं पुष्कळ ज्ञान संपादन केलें. ते धर्म फार करीत असत. एके दिवशीं म्हणजे मार्गशीर्ष महिन्याच्या वद्य दशमीस प्रथम घटी भरतांच, सुव्रत नामक दिनीं, विजय मुहूर्तावर **चंद्रप्रभा**नामक पालखींत बसून **केवळ** प्राप्तीकरितां श्री **महावीर** ज्ञात्रीचा ( जातभाईचा ) **शंदवन** नामक बगीचा होता त्यांत निघून गेले. तेथें अशोक वृक्षाखालीं पालखी उभी केली, खालीं उतरले. दागदागिने, वस्त्रप्रावर्ण टाकून देऊन आपल्या हातानेंच आपल्या डोक्याचे केंस उपटून पांच ठिकाणीं टक्कल केलें. या पुढें वैराग्य.

पुढें तेरा महिने कपडे वापरले, त्यापुढें दिगंबर वृत्ति धारण केली. आणखी पुढें बारा वर्षें शरिरास कष्ट भोगले, त्याही पुढें **महावीर** महाराज **सम्मित्त** म्हणजे दूरदृष्टि झाले, **गुप्त** म्हणजे आत्मसंयमन करणारे अथवा आत्म्याचें संरक्षण करणारे झाले. **सम्मित्त** ( सन्मित्र ) शब्दाचा अर्थ सत्कर्म करण्याची प्रवृत्ति असा करितात, व **गुप्त** या शब्दाचा अर्थ दुर्बुद्धि पासून बचाव करणें असा करितात. या **सम्मित्त** व **गुप्त** साधन प्राप्तीमुळें त्यांस सर्व प्रकारची ज्ञानदृष्टि प्राप्त झाली. भारुंड नांवाचा एक कल्पित पक्षी आहे. त्यास एक शरीर, दोन माना ( गर्दन ) व तीन पाय आहेत अशी

कल्पना आहे. त्या पक्ष्याच्या गतीप्रमाणें त्यांस गति प्राप्त झाली. ( ती कशी असेल बरें ? ) गजराजा प्रमाणें शौर्य प्राप्त झालें, नंदिकेश्वराप्रमाणें ( पोळाप्रमाणें ) शक्ति आली, सिंहाप्रमाणें धैर्य प्राप्त झालें, मेरुमांदार पर्वताप्रमाणें स्थैर्य आलें, महासागराप्रमाणें खोल, चंद्राप्रमाणें रम्य, सूर्याप्रमाणें तेजस्वी, सुवर्णाप्रमाणें शुद्ध आणि धरित्रीमातेप्रमाणें सर्वभारसहिष्णुता. आखेर अग्निनारायणाप्रमाणें तेज इ. इ. इ. प्राप्त झालीं.

पावसाळा खेरीज करून अर्हत **महावीर** गांवढ्यांत एक रात्र, व गांवांत ५ रात्र, राहत असत. सुगंध व दुर्गंध, पेंढ्याची काडी व रत्न, घाण व सोनें, सुख व दुःख हीं त्यांस समानच होतीं. जिवाची परवा नव्हती, मरणाचीही नव्हती !

याप्रमाणें बारा वर्षें गेल्यावर तेराव्या वर्षी, वैशाख महिन्यांत वद्य दशमीस सकाळीं प्रथम प्रहरांत, सुव्रतनाम दिवशीं विजय मुहूर्तावर जृंभिकग्रामाबाहेर रिजुपालका नदीतीरीं, एका जुन्या देवळाजवळ, ‘ साल ’ नामक वृक्षाखालीं समाक नामक एका गृहस्थाच्या शेतांत, उत्तरा फाल्गुनी नक्षत्रावर चंद्र असतांना आसन मांडी घालून, टांचेस टांच लावून दोन दिवस उपाशीं असतांना सूर्याचा अनिवार ताप सहन करीत, पाणी प्यायल्याशिवाय, समाधी लाविली असतां त्यांस ‘ केवलज्ञान ’ प्राप्त झालें.

तपस्वी **महावीर ‘जीन’** अथवा **अर्हत** झाले, त्यांस केवलज्ञान प्राप्त झालें ते सर्वज्ञ झाले, त्यांस सर्व पृथ्वीचें, देवांचें व दानवांचें, ज्ञान झालें.

या वेळीं अशा स्थितींत **महावीर मुनि** पहिल्या पावसाळ्यांत **अस्तिकग्रामीं** राहिले. या गांवास पूर्वी **वर्धमान** असें नांव होतें परंतु **शूळपाणी** नांवाच्या एका यक्षानें आपण मारलेल्या माणसांच्या हाडांचा म्हणजे **अस्थींचा** मोठा एक ढीग करून ठेविला होता त्या ढिगावर गांवकऱ्यांनीं एक देऊळ बांधलें होतें म्हणून त्यागांवाचें नांव **अस्थिकग्राम** असें पडलें. पुढील तीन पावसाळे **महावीर** मुनि चंपा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०२५

व पृष्ठीचंपा गांवीं राहिले. पुढें बारा पावसाळे **वैसाळी** आणि **वानिजग्राम** एथें राहिले. चौदा पावसाळे **राजगृह** गांव व **नालंदा** नांवाचा पाडा आहे तेथें राहिले. **मिथिलेस** ६ पावसाळे, **भद्रिका** शहरीं दोन पावसाळे, **अलंभिका** गांवीं एक पावसाळा, **वज्यभूमि** प्रांतांतील **पंडितभूमि** गांवीं एक पावसाळा, **श्रावस्ती** एथें एक पावसाळा. अखेर शेवटलें वर्ष **मध्यमपापा** अथवा **पापा** नांवाच्या शहराच्या हस्तिपाळ राजाच्या लेखक दप्तरांत ( कचेरींत ) काढलें.

या अखेरच्या पावसाळ्याच्या शेवटच्या—चौथ्या महिन्यांत म्हणजे सातव्या पंध्रवड्यांत कार्तिक वद्य अमावस्येस रात्रौ, हस्तिपाल राजाच्या **पापा** राजधानींतील लेखक वर्गाच्या दप्तरांत ( कचेरींत ) पूज्य मूर्तिमुनि, **महावीर** समाधिस्त झाले. ते **बुध** झाले, ते **सिद्ध** झाले, ते **गुप्त** झाले. या वर्षाचें नांव **चंद्र** असें होतें, चंद्र वर्ष म्हणजे तीनशें चोपन दिवसाचें वर्ष. पांच वर्षांस एक युग म्हणतात. त्यांत तिसऱ्या आणि पांचव्या वर्षास अभिवर्दित म्हणतात, बाकी राहिलेल्या वर्षांस चंद्र वर्ष अशी संज्ञा आहे.

या चंद्र वर्षाच्या प्रीतिवर्धन महिन्यांत, नंदीवर्धन पक्षांत सुव्रताग्निदिवशीं ( उपशमन ) देवानंदानामक रात्रीं सर्वार्थसिद्धि नामक मुहूर्तावर स्वाती नक्षत्रावर चंद्र असतांना **महावीर** मुनीस मरण आलें.

त्याचा पट्टशिष्य इंद्रभूती हा गौतम गोत्रांतला होता. मुनि **महावीराच्या** अंत काळीं इंद्रभूती कोणासी दीक्षा देण्याकरितां गेला होता. त्यानें स्वतः दीक्षा घेतल्यापासून पन्नास वर्षांनीं आपल्या वयाच्या ९२ व्या वर्षीं म्हणजे **महावीराच्या** निधनानंतर १२ वर्षांनीं प्राणोत्क्रमण केलें.

**महावीराचें** निधन झालें त्या रात्रीं **काशी** व **कोसल** एथील अठरा (१८) राजे, नऊ मल्लकी, व नऊ लिच्छवी यांनीं दीपोत्सव केला. जैन लोक कार्तिक

महिन्याच्या प्रतिपदेस **महावीराच्या** निधनतिथीच्या स्मरणार्थ दरसाल दीपोत्सव करीत असतात.

**लिच्छवी** हे मांडलिक राजे होते, **महावीराचा** मामा **वैसालीचा** राजा यास ते करभार देत असत. कांहीं बौद्ध ग्रंथांत त्यास **लिच्छवी** म्हटलें आहे, जैन ग्रंथांत **लेखकी** म्हटलें आहे आणि **प्राकृत** भाषेंत **लेखई** म्हणतात.

**मुनि महावीर** याचें निधन झालें त्या रात्रीं 'क्षुद्राक्रम' नांवाचा एक ग्रह आकाशांत दिसला. तो राखेच्या राशिसारखा दिसत होता. हा ग्रह अंतरिक्षांतील प्रत्येक राशीवर दोन हजार वर्षें पावेतों राहतो. **ग्रीस** देशांत **प्लिनी** नामक इतिहासकारानें **सालामिस** येथील लढाई झाली त्या वर्षीं, बैलाच्या शिंगाच्या आकाराचें एकशेंडें नक्षत्र पडलें होतें, असें लिहिलें आहे. त्याचा या निधनतिथीशीं संबंध असावा असें कांहीं मर्मज्ञ लेखकांस वाटतें, पण बैलाचें शिंग आणि राखेचा पुंजका यांत साम्य कोठें आहे, याचा पत्ता न लागल्यामुळें अजून हें प्रकरण तसेंच पडलें आहे.

मुनि महावीर याच्या निधनप्रसंगीं १४,००० श्रमण इंद्रभूती जवळ होते. ३६,००० योगिनी होत्या. त्यांत **चंदना** नांवाची मुख्य होती १,५९,००० इतके गृहस्थाश्रमी शिष्य होते. त्यांजवर **शं**खशतक मुख्य होता. इ. इ.

मुनि महावीर यांनीं तीस वर्षें संसार केला, बारा वर्षें तपश्चर्या केली. सुमारें ३० वर्षें केवल नांवाच्या स्थितींत ते होते. म्हणजे ४२ वर्षें विरक्त होते एकूण ७२ वर्षें वांचले.

मुनि **महावीराच्या** निधनानंतर "कल्पसूत्र" ग्रंथ लिहिल्यास ९८० वर्षें झालीं. दुसऱ्या एका प्रतींत ९९३ वर्षें झालीं, असें म्हटलें आहे.

इति '**कल्पसूत्र**' ग्रंथसार समाप्त.

# पार्स्व चरित्र.

## ( पारसनाथ. )

काशीचा राजा **अश्वसेन,** राणी **वामा** यांच्या पोटीं अर्हत पार्स्वनाथ जन्मास आला. त्याची आई गरोदर असतांना तिनें अंधारांत एक कृष्ण सर्प सरपटत जातांना पाहिला म्हणून त्याचें नांव पार्स्व असें ठेविलें. पण 'सर्प' आणि 'पार्स्व' यांत काय संबंध आहे याचा अझून पत्ता लागला नाहीं. एके दिवशीं **विशाळा** नामक पालखींत बसून **काशीशहरांतून** बाहेर पडून **आश्रमपद** नांवाच्या एका बागांत अशोक वृक्षाखालीं, **पार्स्व** जाऊन बसला. साडे तीन दिवस पाणी प्याल्याशिवाय उपास केल्यावर त्यानें एक कफनी चढविली आणि आपल्या तीनशें लोकांच्या परिवारासह डोक्यावरील केश उपटून टाकले. विरक्त झाला. त्यानें ८३ दिवस पर्यंत शरीरसुखाचा त्याग केला. ८४ व्या दिवशीं धायटीच्या झाडाखालीं बसून पाण्याशिवाय अडीच दिवस उपास केल्यावर, ध्यान लावून बसला असतांना तो 'केवल' नामक दशेप्रत पावता झाला. त्याच्या बरोबर त्याच्या सांनिध्यास आठ गण आणि आठ गणधर होते. त्याच्या पट्टशिष्याचें नांव **आर्यदत्त** होतें, पट्टशिष्यिणीचें नांव **पुष्पचुला** होतें. **श्रावकांत** म्हणजे संसारी शिष्यांत **सुव्रत** मुख्य होता. संसारी शिष्यिणींत **सुनंदा** मुख्य होती.

तो तीस वर्षांचा होईपर्यंत संसार करीत होता. ८३ दिवस उपासतापास करीत होता, सुमारें ७० वर्षें 'केवलीन्' होता. त्यांत म्हणजे १०० वर्षें आयुष्यांत ७० वर्षें श्रमण होता. त्याच्या मरणाला ( या असल चरित्रलेखनप्रसंगीं ) १२३० वर्षें झालीं होतीं.

# अरिष्टनेमीचें चरित्र.

सौरीपुर, सोरियपूर, सौरिकपूर, या गांवीं समुद्रविजय राजाच्या शिवा नामक राणीच्या पोटीं अरिष्टनेमीचा जन्म झाला. त्याच्या आईनें स्वप्नांत गाडीची धांव पाहिली, तिला "नेमी" म्हणत. तिजपासून रथाच्या वेगामुळें "रिष्ट" म्हणजे दगड ( कंकर ) उडत होते म्हणून अरिष्टनेमी ! एके दिवशीं द्वारावति (सौरीपूर) नगरी सोडून रेवतिक नामक बागांत अशोक वृक्षाखालीं जाऊन त्यानें डोकीचे केस उपटून टाकले. अडीच दिवस निराहार केला, कफनी चढविली, व विरक्त झाला. त्यानें ५४ दिवस शरीर आटविलें. ५५ व्या दिवशीं गिरनार पर्वतावरील एका वटवृक्षाखालीं साडे तीन दिवस उपास केल्यावर त्यास केवलपद प्राप्त झालें. त्याच्या सेवेस १८ गण व १८ गणधर होते. मुख्य शिष्य-वरदत्त, मुख्य शिष्यिण यक्षिणी, मुख्य श्रावक-नंद, मुख्य श्रावकी-महासुव्रता. 'केवल' पद प्राप्त झाल्यापासून १२ वर्षांनीं त्यास सायुज्यपद प्राप्त झालें. त्याचा अंत गिरनारा एथेंच झाला.

## ऋषभ.

कोसलीय म्हणजे अयोध्येंतील रहिवासी ऋषभ अभिजित गांवीं पावन झाला. कुलकर नामक राजकुळांत नाभी राजाच्या मरुदेवी नामक राणीच्या कुशींत त्याचा जन्म झाला. तो काश्यपगोत्रोत्पन्न होता. तो राजा झाला. त्यानें कलाकौशल्याची वृद्धि केली, व्यापार वाढविला. लेखन विद्या आपल्या प्रजेस शिकविली. विनित गांवापासून जवळच सिद्धार्थवन नांवाच्या बागांत अशोक वृक्षाखालीं, त्यानें दीक्षा घेतली. पुरीमताल नांवाच्या गांवाजवळ शकटरवमुख नांवाच्या बागांत न्यग्रोध नांवाच्या झाडाखालीं त्यास केवलपद प्राप्त झालें. मुख्य श्रमण–वृषभसेन, मुख्य श्रमणी-ब्रह्मी सुंदरी, मुख्य श्रावक--श्रेयांस, मुख्य श्रावकी सुभद्रा.

समाप्त.

श्री.

याच ग्रंथकर्त्यानें ग्रंथ लिहिले व प्रसिद्ध केले त्या पुस्तकांची यादीः—

१. **दुष्काळ निवारण.**—सदर पुस्तक उपयुक्त ठरून सरकारांत जंगल खात्यांत वाटण्याकरितां ५०० प्रति खरेदी केल्या गेल्या. शाळाखात्यांत इनाम देण्यालायक ठरलें.

२. **कृषिकर्मांतर्गत रसायनशास्त्र व भूगर्भशास्त्र.**— हें सचित्र पुस्तक मोठें आहे. याची किंमत दोन रुपये असून हेंहि शाळाखात्यांत फार उपयोगी ठरल्यामुळें ५०० प्रति खरेदी केल्या गेल्या. दक्षिणाप्राईझ कमेटीनें रु. १८० बक्षीस दिले ते निराळेच. या दोन्ही पुस्तकांच्या शंभर प्रति **श्रीमंत गायकवाड** सरकारांनीं खरेदी केल्या व इतर ठिकाणींहि पुष्कळ विक्री झाली. हल्लीं हीं पुस्तकें मिळत नाहींत.

३. **विठ्ठलराव देवाजी—काठेवाड** येथील दिवाणजी यांचें चरित्र (इंग्रजी).

४. **रावजी अप्पाजी व बाबाजी अप्पाजी** बडोद्याचे दरखी दिवाण यांच्या घराण्याचें चरित्र.

५. **कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें,** अंक १२—**मुंबई** ग्याझेटियर करितां **सर जेम्स क्यांबेल** यांच्या सांगण्यावरून मिळविलेली माहिती.

६. **सखाराम हरी गुप्ते** यांचें सचित्र इंग्रजी चरित्र.

७. The Industrial Arts of Poona—ग्याझेटीयर वरून नवीन स्वतंत्र पुस्तक (इंग्रजी).

८. **पश्चिम हिंदुस्थानांतील हुन्नर.**—ज्ञानप्रसारक मंडळींत दिलेल्या व्याख्यानावरून. ( मराठी ).

९. **दारू पिणें.**—हिंदू युनियन क्लबमध्यें दिलेलें व्याख्यान. यांत आपण विलायतेस गेलों होतों तरी दारूचें सेवन केलें नाहीं, प्रकृति चांगली राहिली असेंही प्रतिपादन केलें आहे.

१०. **हिंदुस्थानांतील लोकमत.**—सर. डब्ल्यु. लिवार्नर यांच्या व्याख्यानाचें मराठी भाषांतर.

११. **हिंदुस्थानांतील कारागिरीचें वर्णन ( देशी हुन्नर. )**—हेंही पुस्तक मोठें झालें आहे. याजवर केसरी वगैरे वर्तमानपत्रांत अनुकूल अभिप्राय आले आहेत. हें सरकारांत पसंत झालें असून याच्या १००० प्रति प्रत्येकीं किंमत रुपये दोनप्रमाणें खरेदी केल्या गेल्या.

१२. Descriptive Catalogue of the Victoria and Albert Museum—सरकारांतून छापलें गेलें आहे.

१३. Descriptive Catalogue of the School of Art Museum—सरकारांतून छापलें गेलें.

१४. Descriptive Catalogue of the Art-ware, contributions to the Bombay Court of the Calcutta International Exhibition—इंडिया सरकारांतून छापलें गेलें.

१५. Descriptive Catalogue of the Bombay Manufacture's Court at the Calcutta International Exhibition, 1883—सरकारांतून छापलें गेलें.

१६. Guide to the Poona Exhibition, 1888.— कमिटीनें छापलें.

१७. **कर्तव्यभूमिति.**—सरकारांतून छापली गेली. **आर्टस्कुलाच्या** क्रामिक पुस्तकांत दर्ज आहे. रु. २०० सरकारांतून इनाम मिळालें.

१८. **कर्तव्य भूमितीचीं मूलतत्वें.**—सदरप्रमाणें रु. ५० इनाम मिळालें.

१९. **होळकरशाईतील पोंवाडे.**—मिळवून छापून प्रसिद्ध केले.

२० **होळकरशाईतील रेव्हेन्यू सरक्युलरें.**—**नेरन्** साहेबांच्या यतींवर, दरबारांनीं पसंत करून छापलें.

२१. **होळकरशाईतील पोलीस ह्यांड-बूक.**—सदरप्रमाणें.

२२. **बरलाई, खजराणा** व **डकाचा** या तीन इनाम गांवांबद्दल मुलकी खात्याची माहिती–त्रिवर्ग इनामदार साहेब यांनीं छापविलें.

२३. **अहिरोबा.**—पारसनीसकृत **करमणुकींत** आलेलें. नुसतें पुस्तकरुपानें छापून प्रसिद्ध केलें.

२४. **इंदूर प्रकरणाची दुसरी** व **खरी बाजू, धनुर्धारीकृत.**— सरकारी कागदपत्रांवरून खरडा तयार करून **धनुर्धारीस** दिला. छापण्याचा वगैरे खर्च सुमारें १,००० रुपये स्वतः सोसला.

२५. Indore from Jubilee to Jubilee—( इंग्रजी ) स्वतः-च्या खर्चानें छापून फुकट वाटलें.

२६. **विठ्ठलराव देवाजी काठीयावाड येथील दिवाण** व **बापुजी रघुनाथ धार येथील दिवाण**-यांच्या घराण्याचा इतिहास.

२७. **बाबाजी अराजी खासगीवाले** यांजकडील कागदपत्र, ( दिवाण भास्करराव विठ्ठल यांनीं बखर रूपानें लिहिलेले ) प्रसिद्ध केले.

२८. **कारकुनी पंचांग.**—यांत दिवाण बहादूर लक्ष्मण जगन्नाथ, दादोबा देवाजी, यांचीं चरित्रें आहेत.

२९. **सार्वजनीक टीका.**—सर. डब्ल्यू. लीवार्नर यांच्या व्याख्यानांचें मराठी भाषांतर.

३०. **म्यानिला हेंप.**—म्यानिला येथें केळींची लागवड करून त्यांजपासून धागे कसे काढतात, याचें सविस्तर वर्णन सरकारच्या हुकमाप्रमाणें लिहिलें. तें सरकारी खर्चानें छापलें जाऊन ( मराठींत व इंग्रेजींत ) जिल्ह्यांनिहाय व तालुक्यांनिहाय फुकट वाटलें गेलें. त्यांजबरोबर सरकारांतून केळीचे मुणवेही लागवडीकरितां कांहीं ठिकाणीं वाटले गेले. शा प्रकारे सर्व धंद्यास उत्तेजन मिळालें.

३१. **जूट व मलाक्का फायबर.**—बंगाल्यांत लाखों रुपयांचा व्यापार होत असलेले **जूट** व मुंबईतील जंगली झाड **मलाक्का** यांजबद्दल लागवडीची आणि धागे काढण्याची माहिती. सरकारांतून इंग्रेजींत व मराठींत छापले जाऊन वाटलें गेलें व नवीन धंदा सुरू झाला.

३२. Descriptive Catalogue of the Ethnological Collection of the Bombay Court, Calcutta Exhibition, 1883—इंग्रजी. इंडिया सरकारानें छापवून प्रसिद्ध केलें.

३३. Guide to the Industrial Art Exhibition, Bombay, 1899. (इंग्रजी) लार्ड रे यांच्या नांवाचें "रे वर्कशॉप" आर्ट स्कुलास जोडलें त्यावेळीं झालेल्या प्रदर्शनाची वर्णनपर मार्गदर्शिका. सरकारांतून छापलें आहे.

३४. पश्चिम हिंदुस्ताननां हुन्नरो.—गुजराथी–मुंबई ज्ञानप्रसारक सभेपुढें

फ्रामजी कावसजी हॉलांत दिलेलें व्याख्यान. रुपये ५० इनाम मिळाले, परंतु ती रक्कम सभेसच परत दिली.

३५. देशी रंगारीनुं काम. गुजराथी. सदर प्रमाणें.

३६. Souvenir, Poona Exhibition, 1888. फोटोग्राफसह इंग्रजींत छापलेलें आलबम. थोड्याच प्रति छापून वाटल्या.

३७. Souvenir, Reay Workshop. सदर प्रमाणें.

३८. The Journal of Indian Art. या त्रैमासिक रंगीत सचि पुस्तकाचे मुंबई इलाख्याचे सरकारांतून नेमलेले एडीटर गुप्ते असल्यामुळे यां [illegible] आर्टिकलें त्यांत आहेत प्रत्येक पानभर मजकुराबद्दल एक [illegible] म्हणजे रुपये १५ मिळत.

३९. होळकर शाईची बखर—प्रसिद्ध केली.

४०. साष्टीकर घराण्याची बखर.—जगत्समाचारांत प्रसिद्ध केली. दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

४१. जीवांतक.—वैजयंतीचा पहिला मणी, एज्युकेशन सोसायटी प्रेस, भायखळा, मुंबई. किं. १।। आणा.

४२. स्मरणशक्तीची वृद्धि. वैजयंतीचा दुसरा मणी. ग्रंथमाला, कोल्हापूर.

४३. मोडी लेख व त्यांचें जनकत्व, वैजयंतीचा तिसरा मणी. किंमत आणे ४.

४४. ज्ञाति पुत्त जैन, प्रस्तुत पुस्तक वैजयंतीचा चौथा मणी. किंमत आणे. ४.

---

एज्युकेशन सोसायटी, भायखळा, मुंबई.

ग्रंथालय ... ९०२८ ... शाखा